(ड) भारत नाट्य समाजाची संमेलने
अध्यक्षीय भाषणे

रंगभूमी नियतकालिकात, भारतनाट्यसमाजाच्या चवथ्या संमेलनापासून ते बाराव्या संमेलनापर्यंतचे अहवाल व काही अध्यक्षीय भाषणातील महत्त्वपूर्ण भाग आलेला आहे. बाराव्या संमेलनानंतर एकदम बावीसाव्या संमेलनाविषयीचा मजकूर आहे. संमेलनाध्यक्षांच्या भाषणातून भारतीय नाट्यपरंपरा, इतिहास, आपल्या नाटक मंडळ्या, नाटककार, नट, नाट्यविषयक विविध प्रश्न अशा स्वरूपाचा ऊहापोह केला गेला आहे. नाट्यविषयक समस्या सोडविण्याचा, त्या त्या वेळच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या भाषणांमधून केला गेला आहे. चर्चाविषयाबाबत अध्यक्षांनी आपापली मते व्यक्त केलेली दिसतात. भारतनाट्यसंमेलनांचे अध्यक्षपद भूषविलेल्या व्यक्ती या अर्थातच नाट्यक्षेत्राच्या व्यासंगी, विद्वान्, प्रतिष्ठित आणि नाटक या विषयाबद्दल कळकळ असलेल्या होत्या. त्यामुळे संमेलनाध्यक्षपदावरून त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांना अभ्यासकाच्या दृष्टीने महत्त्व आहे म्हणून त्यापैकी महत्त्वपूर्ण भाषणांचा आढावा येथे घेतला आहे.

(१) चवथ्या संमेलनाचे अध्यक्ष रा. नीळकंठ विनायक छत्रे यांचे विचार

चवथ्या संमेलनाचे अध्यक्ष रा. नीळकंठ विनायक छत्रे यांनी भाषांतर-रूपांतराच्या प्रश्नाची चर्चा केली आहे. ते म्हणतात शेक्सपीअर, रॅसिन (फ्रान्स), आलफेरी (इटली), शिलर (जर्मनी) या नाटककारांच्या कृती भाषांतररूपाने आपल्यापर्यंत पोहोचल्या तर तिकडील लोकांचे रीतिरिवाज, समाज सुधारणेची स्थिती, नैतिक व राजकीय विचार आपल्याला समजतील. आपल्याकडे झालेल्या अशा रूपांतरित नाटकांच्या प्रयोगांचा उल्लेख अध्यक्षांनी केला आहे. स्टुडंटस् सोशल क्लबने ‘‘मोहनतारा’ चा प्रयोग केला. तो चांगला वठला. प्रयोग होत असता प्रेक्षकांची व नटांची एकतानता झाल्यामुळे प्रयोगातील रीतिरिवाज, विचारसरणी, व देशकालांचे स्थित्यंतर यांकडे कोणाचेच लक्ष गेले नाही. ऑथेल्लो, हॅम्लेट यांचेही उत्तम नटांनी केलेले प्रयोग पाहात असता या गोष्टींचा विसर पडतो, पण पुढे घरी गेल्यावर ह्या गोष्टी लक्षात येऊ लागतात. तारा ही बागेतील गच्चीत बसली असता मोहन चोर वाटेने येऊन आपले प्रेम प्रगट करतो. ही गोष्ट आपल्या रीतिरिवाजांस सोडून आहे. हॅम्लेटमध्ये, राजाने, आपल्या वडील भावाच्या बायकोशी

विधिपूर्वक लग्न केल्याबद्दल सांगितले आहे. ही गोष्ट देखील आपल्या हल्लीच्या रिवाजास धरून नाही. भाषांतरकाराने ''वरात् च सुतोत्पत्ति: ' असे या विवाहाचे समर्थन केले आहे पण नाटकातील नेपथ्यरचनेवरून हा देखावा पूर्वकालीन दिसून न आल्यामुळे अगदी विलग वाटतो.

या विवेचनावरून स्पष्ट दिसते की भाषांतरे-रूपांतरे झालीच पाहिजेत असे रा. छत्रे यांचे मत आहे. रूपांतरित नाटकात जर अभिनयकुशल नट असतील तर प्रेक्षक तल्लीन होऊ शकतात पण हा तत्कालिक परिणाम ठरतो. त्या नाटकावर चिंतन केल्यावर भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने विसंगत गोष्टी जाणवतात. याचाच अर्थ अभिनयाचे सामर्थ्य खूपच असते. त्या बळावर नट प्रेक्षकांना अपरिचित दुनियेतसुद्धा खिळवून ठेवू शकतो. रूपांतरित नाटकांमधील नेपथ्यरचनेबाबतचा मुद्दा महत्त्वाचा आहे. नाटकाचा काळ आणि संस्कृती लक्षात घेऊन जर नेपथ्यरचना केलेली नसेल तर नाटकांतील प्रसंगांना योग्य ती पार्श्वभूमी मिळत नाही व परिणाम उणावतो. दृश्य, किंवा संवादसुद्धा सुसंगत वाटत नाहीत. अशा काही अडचणी असल्या तरी पाश्चात्य नाटके, कादंबऱ्या मराठीत आल्या पाहिजेत. कारण त्यामुळे त्या त्या देशातील प्रतिभापूर्ण उत्तम लेखकांचे त्रिकालाबाधित सिद्धांत काय आहेत ते आपल्याला समजते. आपल्यातले व पाश्चात्यांचे विचार, रीतिरिवाज जवळजवळ मांडून तुलना केल्याखेरीज त्यातील ग्राह्याग्राह्यता ठरविता येणार नाही. म्हणून विलग न दिसण्यासाठी एक तर आपलेकडील रीतभात कायम ठेवून विचार मात्र होतील तेवढेच घ्यावेत किंवा सर्वच सरळ भाषांतर करून तिकडील पोशाख व नेपथ्य कायम ठेवावे. भाषा मात्र मराठी असावी.

(२) पाचव्या संमलेनाचे अध्यक्ष डॉ. गर्दे यांचे विचार

पाचव्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष डॉ. गर्दे यांनी नाट्यकलेची चार अंगे सांगून त्यांचे विवेचन केले :-

१) कवी, २) नट, ३) रंगभूमी, ४) प्रेक्षक

कवी (नाटककार) हा बहुश्रुत हवा. त्याची अवलोकनशक्ती चांगली हवी. तो प्रतिभावान् व भाषाप्रभु असावा. भाषा त्याच्या स्वाधीन असली पाहिजे. त्या त्या भूमिकेची भाषा त्याच्या बुध्दीतून निघाली पाहिजे. भाषेत शब्दलालित्य व प्रसाद हे गुण पाहिजेत. तो स्वत: नट असावा किंवा त्याने पुष्कळ नाट्यप्रयोग पाहिलेले असले पाहिजेत. डॉ. गर्दे यांच्या मते

यापैकी एखादा गुण जरी कमी असेल तरी त्याच्या हातून उत्तम नाटक रचले जाण्याचा कधीही संभव नाही.

उत्तम नाटकांचे कथानक देशकालाला अनुरुप असावे त्याचे संविधानक मजेदार असावे. भाषा पात्रानुरुप असून तिच्यात सुगमता, पदलालित्य, प्रसाद व माधुर्य असावे. नाटक अतिऱ्हस्व किंवा अतिदीर्घ नसावे. मध्यमप्रमाणात असावे. ते पाच तासात संपावे व पाच अंकी असावे. नाटक नानारसात्मक असून बोधप्रद असावे.

नाटकासंबंधीच्या काही कल्पना आज किती बदलल्या आहेत ते हे विवेचन वाचल्यावर जाणवते. ‘मध्यमप्रमाण म्हणजे पाच तासांचे नाटक रसाविष्कार व बोधप्रदता यांचा उल्लेख भारतीय परंपरा व दृष्टिकोन यांचा निर्देशक आहे. विशिष्ट काळात विशिष्ट संकेतांचा पगडा असतो हेच यावरून दिसते. नाटक कसे असावे याचे विवेचन डॉ. गर्दे यांनी, भरतमुनींच्या ‘नानारसात्मक लोकचरित या कल्पनेनुसार केले आहे. विद्वानांच्या मनावर संस्कृत नाट्यादर्शाचा कसा पगडा होता हे येथे लक्षात येते.

नटामध्ये कायिक, वाचिक, मानसिक असे तिन्ही प्रकारचे गुण असावेत. तो निर्व्यसनी असावा. नटशाळेत शिकून नट तयार झालेले असावेत असे सांगून प्राचीन काळातील, पाणिनीय व्याकरण सूत्राचा आधार दिला आहे.

पाराशर्य शिलालिभ्यो भिक्षुनटसूत्रयो:
शैलालिनो नटा: । कर्मंद कृशाश्वादिभि:
कृशाश्विनो नटा: ।

शिलाली, कृशाश्व इ. आचार्यांनी नटशाला घातल्या होत्या व त्यांच्या शाळांतून जे नट तयार होत त्यांना ‘शैलालिनोनटा: , ‘कृशाश्विनोनटा: अशा संज्ञा देत असत. डॉ. गर्दे म्हणतात, या पूर्वपरंपरेचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे. नटशाळा निघाल्या पाहिजेत, त्यात शिक्षण घेऊन उत्तम नट तयार झाले पाहिजेत. त्याशिवाय नाट्यकलेची सुधारणा होणार नाही.

येथे नटांच्या शिक्षणाबाबतचा जो विचार आला आहे तो नाटकाच्या संदर्भातील शिक्षणाचा आहे. या खेरीज रंगभूमीकारांनी आणि इतरही लेखकांनी नटांच्या व्यावहारिक व शालेय स्वरूपाच्या शिक्षणाचा विचारही वेळोवेळी मांडलेला आहे त्याबद्दलची चर्चा या प्रकरणात यापूर्वी केलेलीच आहे.

रंगभूमी चार गुणांनी युक्त असावी -

१) सुविस्तीर्णता, २) बसावयाच्या जागांची योग्य रचना व व्यवस्था, ३) हवाशीरपणा व स्वच्छता, ४) उपकरणांची पूर्तता

एकूण हे सर्व विवेचन भरताच्या नाट्यशास्त्राच्या आधारे एकेक घटकाचा विचार मांडणारे चाललेले आहे हे स्पष्ट दिसते. यात आदर्श कल्पनांचे सूचन आहे. पूर्वपरंपरा आणि त्यातील ठाशीव विचारसरणी यांचे स्मरण देण्याचा प्रयत्न आहे.

प्रेक्षक हा रसिक व सहृदय असावा त्याप्रमाणे त्याच्यात खर्चिकपणा हाही गुण असावा असे डॉ. गर्दे सांगतात. प्रेक्षकांच्या फुकटेगिरीवर रंगभूमी नियतकालिकात कधी उघड उघड गंभीरपणे, तर कधी विनोदी, उपरोधपूर्ण रीतीने, असे खूपदा लिहिले गेले आहे. नाटक मंडळीच्या मॅनेजरला फुकट पासाची अपेक्षा ठेवणारे प्रेक्षक ही एक डोकेदुखीच होत असे. यादृष्टीने डॉ. गर्दे यांनी प्रेक्षकांच्या खर्चिकपणाचा 'गुणा' त केलेला समावेश खूप काही सांगून जातो.

आपल्या भाषणाच्या शेवटी डॉ. गर्दे यांनी नाटकमंडळ्यांच्या व्यवस्थापकांबाबतचे एक निरीक्षण नोंदविले आहे, ते म्हणतात, पौराणिक नाटक मंडळ्यांमध्ये व्यवस्थापकाचा नटवर्गावर जो दाब असे व त्यामुळे त्यांच्यात जी सुव्यवस्था असे, ती हल्ली आढळून येत नाही म्हणून आधुनिक नाटक मंडळ्यांनी तिकडे विशेष लक्ष द्यावे.

(३) सहाव्या संमेलनाचे अध्यक्ष प्रो. भानु यांचे विचार

सहाव्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष प्रो. चिं. गं. भानु यांनी आपल्या भाषणात प्राधान्याने नाट्यव्यवसायातील अडचणींचा, नाटकमंडळ्यांचा व नाटकाचा विषय कोणता असावा

याबाबतचा विचार मांडला आहे. नाटकांवर सरकारी अवकृपा झाली होती आणि त्याचा त्रास व परिणाम नाटकमंडळ्यांना भोगावा लागत होता. प्रेक्षकही नाटकमंडळ्यांनी कोणकोणत्या धर्मकृत्यास मदत करावी याबाबत सूचना करू लागले होते. कल्पक व प्रतिभाशाली नाटककारांची उणीव जाणवत होती. नाटक मंडळीत निष्ठावान माणसांपेक्षा चंचल – सतत नाटक मंडळ्या बदलणारी व व्यसनी माणसे फार झाली होती. नाटक धंदा एकूण आर्थिक अडचणीत होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी नट व नाटकमंडळ्यांनी झटणे जरूर होते. नटांचे वर्तन, नाटक मंडळ्यांची नीतिमत्ता समाजनीतीच्या खालच्या पायरीवर गेली होती. हे प्रो. भानु यांना स्पष्टपणे सांगावे लागले आहे. नाटकाच्या विषयाबाबत त्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, वास्तविक नाटक विषयाला निर्बंध असू नये पण आपल्याकडे अजून लोकांना तितकीशी समजूत आलेली नसल्याने परिस्थिती अनुकूल नाही. नाटकविषयाबाबत अनेक दृष्टींनी विचार केला गेला पाहिजे हा मुद्दा त्यांनी सोदाहरण मांडला आहे.

(४) नवव्या संमेलनाचे अध्यक्ष रा. छापखाने यांचे विचार

नवव्या संमेलनाचे अध्यक्ष रा. केशवराव रामचंद्र छापखाने हे होते त्यांनी ‘ कलेचे स्वरूप या विषयावर भाषण केले. ते म्हणतात, नाटकात फक्त अभिनयच नसतो तर देखावे, सुंदर पात्रे, गायन वगैरेही असते. हल्ली नाटकात संपूर्ण भोग पाहिजेत असे प्रेक्षक म्हणू लागले आहेत. पंचेंद्रियांनी आनंद घेता येण्यासाठी, कलेत व्यक्त होणारे सौंदर्य भोगण्यासाठी आत्म्याची उन्नती झालेली असली पाहिजे. योग्य नजरेने कला पाहण्यास शिकले पाहिजे. कलेत व्यंजना असली पाहिजे.

कलेचे स्वरूप स्पष्ट करता करता प्रेक्षकांची पूर्वतयारी कशी असावी लागते याबाबत येथे व्यक्त झालेले विचार महत्त्वाचे आहेत. मात्र हे विवेचन बरेच त्रोटक आहे. नाटक घडविण्यामध्ये, नाट्यकलेच्या विकासामध्ये प्रेक्षक हा महत्त्वाचा घटक आहे. हा विचार रंगभूमी नियतकालिकात वारंवार आला आहे. त्याकाळामध्ये पदवीधरांची संख्या कमी होती. शिक्षणाचा एकूण प्रसारच कमी होता. त्यामुळे प्रेक्षकांना कलेची दृष्टी देण्याचे काम विद्वान, जाणकार मंडळींना आणि रंगभूमीकारांना करावे लागले आहे.

(५) दहाव्या संमेलनाचे अध्यक्ष प्रो. शि. म. परांजपे यांचे विचार

दहाव्या संमेलनाचे अध्यक्ष प्रो. शिवराम महादेव परांजपे यांनी नाट्यकलेचा पूर्वेतिहास सांगून त्याचे सद्य:स्थितीशी असलेले साम्य विशद केले. नट व नाटकमंडळ्या यांनी आपल्यात सुधारणा करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. संस्कृत नाटके सत्वगुणी आहेत व इंग्लिश नाटके रजोगुणी आहेत असा अभिप्राय त्यांनी दिला. नाटकमंडळ्यांमधील अंतर्गत कलहाबद्दल त्यांनी विवेचन केले.

नाटक मंडळ्यांमधील भांडणे, फाटाफूट, नटांनी सतत नाटकमंडळ्या बदलणे, नव्या नाटक मंडळ्यांची स्थापना, एका नाटक मंडळीतील नट दुसऱ्या नाटकमंडळीने फोडून आपल्याकडे घेणे हे सगळे प्रकार त्याकाळी सतत घडत होते. नाटक मंडळीच्या प्रत्येक व्यवस्थापकाने किंवा मालकाने या घडामोडीत भाग घेतला आहे. त्यांच्या चिंतेचाही तो विषय झाल्याचे स्पष्ट जाणवते. नाटक व्यवसायात सुधारणा होण्यामधील तो फार मोठा अडथळा होता. या परिस्थितीची चर्चा करणे संमेलनाध्यक्षांना आवश्यक तर होतेच पण फार स्पष्ट बोलणेही अवघड होते हे शि. म. परांजपे यांच्या भाषणाच्या वृत्तांतावरून दिसते.

(६) अकराव्या संमेलनाचे अध्यक्ष रे. ना. वा. टिळक यांचे विचार

अकराव्या संमेलनाचे अध्यक्ष रे. ना. वा. टिळक यांनी अनेक महत्त्वाच्या मुद्यांचा परामर्ष घेतलेला दिसतो. सुरुवातीला त्यांनी तत्कालीन एकूण वातावरणाचा उल्लेख केला आहे. महायुद्ध सुरू होते. (१९१५) त्यामुळे लोकांची मने अस्वस्थ होती. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या निधनाच्या दु:खद घटनेचा महाराष्ट्रातील लोकांच्या मनावर परिणाम झालेला होता. अशा वातावरणात १९१५ चे नाट्यसंमेलन भरले होते.

रे. टिळक यांनी नाटकाच्या संदर्भात भारतातील परिस्थिती आणि इंग्लडमधील परिस्थिती यांची तुलना केली. नाट्याचे वेगळेपण वैशिष्ट्यपूर्ण शब्दात सांगितले. नाट्य हा प्रथमत: मानवी बुद्धीने प्रगल्भ, उदात्त, कमनीय केलेला असा स्वभाव आहे. या विधानात मानवी बुध्दी आणि स्व-भाव यांचे त्यांनी जोडलेले नाते मनोरम आहे. मानवी बुद्धीने, स्व-भावांचे उदात्तीकरण करणे, त्यांना सौंदर्यपूर्ण बनविणे म्हणजेच कलेला जन्म देणे असेच रे. टिळक यांना म्हणावयाचे आहे. अशी कला, असे नाट्यच भिन्न अभिरुचीच्या लोकांचे समाराधन करू शकते. ते सर्वांना सहज प्रिय असते. भरताच्या नाट्यशास्त्रातील उल्लेखानुसार या

‘ सार्ववर्णिक वेदा चे, रे. टिळक यांनी केलेले वर्णन व अर्थस्पष्टीकरण आधुनिकतेचा स्पर्श असलेले आहे.

भारतात नाट्य हे, देवळे, देवदेवता यांच्याशी सतत निगडित होते. तसेच इंग्लडमध्येही नाट्य, चर्चशी निगडित होते असे सांगून रे. टिळक यांनी इंग्लडमध्ये नाटक कसे जन्माला आले त्याचे विवरण केले आहे. संस्कृत आणि मराठी नाटकांच्या परंपरेचा विचार पूर्वपीठिकेचा विचार इतर संमेलनाध्यक्षांच्या भाषणात, रंगभूमी नियतकालिकातील लेखांत बरेचदा आलेला आहे. पण इंग्लडमधील, एकूणच युरोपातील अंधारयुग संपून नव्या युगाला झालेला प्रारंभ, त्यामुळे बदललेली जीवनदृष्टी आणि नाटकाचा उदय या सगळ्यांची चर्चा रे. टिळक यांच्या भाषणात आढळते हे या भाषणाचे वैशिष्ट्य आहे. संस्कृत रंगभूमीप्रमाणेच युरोपीय रंगभूमीचा मराठी रंगभूमीवर प्रभाव असल्यामुळे ही पार्श्वभूमी विशद करणे त्यांना अगत्याचे वाटले असावे. त्यामुळे मराठी रंगभूमीच्या प्रेरणा-प्रभावांचा अन्वयार्थ लावण्यास मदत होते म्हणून १९१५ मध्ये केलेले हे विवेचन महत्त्वाचे आहे.

रे. टिळक सांगतात, सोळाव्या शतकाच्या शेवटी इंग्लडमध्ये नवजीवन सुरु झाले. नवे विचार, नवी ध्येये, इंग्लडची नवी राणी हे इंग्लडमधील माणसांच्या सामर्थ्याचे अभिमानाचे केंद्र बनले. साऱ्या युरोपात इंग्लड ही विशिष्ट सत्ता आहे ही भावना प्रत्येक इंग्रजाच्या मनात निर्माण झाली. त्यामुळे मनुष्याच्या विचाराचा विषय ‘ मनुष्य बनला. परलोकवाद संपून इहवाद जन्माला आला. निवृत्तीऐवजी प्रवृत्तीचे साम्राज्य सुरू झाले. मानव महत्त्वाचा वाटू लागला. मानवी विभूती जशी आहे तशी पाहिल्यावाचून लोकांचे समाधान होईना. चित्रकला, काव्य या कलांनी समाधान होईना. मानवी ‘कृती डोळ्यापुढे उभे करण्याचे सामर्थ्य नाटकात आहे. नाटकाने जिवंत माणसे उभी केली. माणसाची सुखदु:खे, चांगल्या वाईट कृती, प्रसन्न किंवा खिन्न वृत्ती पाहाण्याची जनतेची उत्कंठा नाटकाने पुरी केली. आणि इंग्लडमध्ये खऱ्या अर्थाने नाटकाचा उदय झाला.

या विवेचनात, इंग्लडमधील नाट्याची पूर्वपीठिका आहे त्याचप्रमाणे ललितकलांपैकी एक कला - चित्रकला व साहित्य शाखेतील एक शाखा - काव्य यांपेक्षा नाटक का व कसे वेगळे आहे, ते मानवी मनाला अधिक आवाहन करणारे का आहे त्याबद्दलचा महत्त्वपूर्ण विचारही आहे.

चित्र, शिल्प, काव्य यात ‘ स्थिती आहे. गती नाही या कला Static आहेत Dynamic नाहीत. नाटकात विविध मानवी कृतींचा पट दृश्यरूपाने डोळ्यापुढे साकार होत असल्याने पंचेंद्रियांच्या शक्ती, प्रेक्षकांच्या ठिकाणी एकवटतात. नाटकाचे हे सामर्थ्य उदंड आहे. स्थायिभावांना आवाहन व त्यांचे उन्नयन करण्याची ताकद नाटकात आहे हा विचार रे. टिळक यांना मांडावयाचा होता असे दिसते.

तत्कालीन नाट्यविषयक स्थितीबद्दल त्यांनी सांगितले की आपल्याकडे चाळीस वर्षांपूर्वी नाटकाबाबत जी स्थिती होती ती बदलून तिला कलेचे स्वरूप येत आहे. नटाचे कौतुक होऊ लागले आहे. नाट्यकलेविषयी विचार होऊ लागला आहे. कोणत्याही राष्ट्राच्या जागृतीचा, प्रगतीचा व नाट्यकलेचा निकट संबंध असतो. आपल्याकडेही शेक्सपीअर जन्माला यायला हवा. तो केव्हा येईल ज्या दिवशी आम्ही लोकाभिरूचीचे गुलाम नसून तिला वाकविणारे तिचे मालक आहोत या आत्मप्रत्ययाने नाट्यकवी व नट निर्भर होतील तेव्हा शेक्सपीअर किंवा त्याच्या तोडीचा नाटककार भारतात निर्माण होईल.

मराठी रंगभूमीला शेक्सपीअरचा परिचय झाल्यापासून (ऑथेल्लो-महादेवशास्त्री कोल्हटकर १८६७) सुमारे पन्नास वर्षातच भारतात शेक्सपीअर जन्मावा अशा आशावाद विचारवंतांना प्रगट करावासा वाटला हे सुचिन्हच म्हणावयास पाहिजे. या आशावादाबरोबरच नाटककार व नट यांचे म्हणजेच कलावंतांचे स्वातंत्र्य व स्वायत्तता, याबाबतचे भान खूपच महत्त्वाचे आहे.

नाटक हे लोकशिक्षण करू शकते हे त्याचे सामर्थ्य आहे असे सांगून रे. टिळक यांनी ती जबाबदारी नटवर्ग, लेखक, रंगभूमी व प्रेक्षक या चारही घटकांवर असल्याचे प्रतिपादन केले आहे. त्यांच्या जवळ ध्येयवादित्व पाहिजे. नीतिमत्ता हवी. तत्त्व व आचरण यात एकवाक्यता, नि:स्वार्थी वृत्ती हवी. तर नाट्यकला राष्ट्राला तारू शकेल. नाट्यकला व नट ही लोकशिक्षणाची संस्था आहे पण ती तशी असणे किंवा नसणे हे नाट्यकवीच्या आधीन आहे असे म्हणून अधिक ऊत्तरदायित्व नाटककारावरच आहे असा अभिप्राय व्यक्त केला आहे.

नाटकाच्या रचनेसंबंधी रे. टिळक यांनी काही सूचना केल्या; त्या पुढीलप्रमाणे आहेत -

(१)   हास्यरसनिर्मितीसाठी मुद्दाम काही पात्रे निर्माण करणे हे नाटकाच्या संविधानकास हानिकारक आहे. तसेच इतके गद्य आणि इतके पद्य असलेच पाहिजे असा ठराव करून संगीत नाटकांची रचना होणे ही संगीताची आणि नाटकाची, दोन्हीची थट्टाच होय.
(२)   आत्मगत भाषणे म्हणजे आत्मगत विचारांचे प्रगटीकरण. हे भाषणापेक्षा मूकाभिनयाने झालेले चांगले. कारण आत्मगत भाषण अस्वाभाविक आहे. संगीत नाटकात आत्मगत भाषणाचा प्रसंग हाच खरा गाण्याचा प्रसंग आहे.
(३)   ंसगीत नाटकात खूप पदे असू नयेत. उत्कट रसाचा कळस करणारी पदे फक्त असावीत. नाटकाचे ‘स्व-रूप कायम रहावे. तो गायनोत्सव होऊ नये.
(४)   विचार, उच्चार आणि आचार यांचे किती साहचर्य आहे हे नाटकात चांगलेच प्रत्ययाला येते. अनेक नाट्यकवींमध्ये ही विसंगती दिसते. नाटकातील शब्दयोजना अभिनयाला अनुकूल असली पाहिजे.
(५)   संगीत नाटकाला नाटकच म्हणावयाचे असेल तर त्यातील पदांची रचना व चाली, रसाला, अभिनयाला योग्य अशा असाव्यात.

आत्मगत भाषणे व संगीत नाटकातील पदांची संख्या हा फार मोठ्या चर्चेचा विषय होता. एका दृष्टीने या समस्याही होत्या. नाट्यप्रयोगांवरील अभिप्रायात त्यासंबंधी लिहिले गेले आहे परंतु आत्मगत भाषणांसंबंधी रे. टिळक यांच्या खेरीज कोणत्याही संमेलनाध्यक्षाने ठाम मत व्यक्त केलेले दिसत नाही. मूकाभिनयाने आत्मगत विचारांचे प्रगटीकरण साधेल असे मात्र वाटत नाही. आत्मगत भाषणांसंबंधीची ही सूचना मराठी रंगभूमीवर कधी अमलात आणली गेली असल्याचे माहीत नाही. परंतु एरवी मूकाभिनयाला किंवा स्तब्धतेला रंगभूमीवर महत्त्व आहे हे निर्विवाद. संवादापेक्षा मूकतेनेच परिणाम साधला जातो अशा जागा नाटकात असतात परंतु तो आत्मगत भाषणांना पर्याय ठरू शकत नाही. नाटकातील पदामधून आत्मगत संवाद व्यक्त करणे नेहमीच साधेल असे नाही.

रंगभूमीवर येणाऱ्या पात्रांच्या कार्याबद्दलचा विचारही रे. टिळक यांनी मांडला आहे. त्यांच्या मते रंगभूमीवर येणारी पात्रे ज्या भूमिका घेतात त्यांना दोन प्रकारची कार्ये करावयाची असतात.

(१) भाषणादि कृती करण्याचे,
(२) त्या कृतीचे आपणावर कोणते परिणाम होतात ते दाखविण्याचे

रे. टिळक यांनी संगीत नाटकांवर असा आक्षेप घेतला आहे की, संगीत नाटकात हे दुसरे कार्य होतच नाही. ''किती किती सांगू तुला...' असे सुभद्रा गात असते व तिची सखी दगडी पुतळ्याप्रमाणे बसलेली असते. एका पात्राच्या भूमिकेची प्रतिक्रिया दुसऱ्या पात्रावर होत असते, ती व्यक्त केली पाहिजे हे शिक्षण नटांना देणे आवश्यक आहे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. नटांच्या नाट्यशिक्षणाची तर आवश्यकता आहेच पण वाङ्मयीन वाचन, Debating Clubs , क्रमिक पुस्तके हे सगळे असणेसुद्धा त्यांच्या मते गरजेचे आहे. शिवाय प्रेक्षकही मर्मज्ञ, रसिक, उच्च मनोवृत्तीचे भोक्ते असावेत. सरकारप्रमाणेच लोकांनी किंवा भारतनाट्यसमाजासारख्या संस्थेने नाट्यपरीक्षक मंडळ नेमावे अशी सूचना त्यांनी केली आहे. त्यासाठी संघ-सामर्थ्य, उच्च ध्येयाचे उपासकत्व हवे ही जाणीवही दिली आहे.

नाटकात दिल्या जाणाऱ्या 'वन्स मोअर ला रे. टिळक यांचा विरोध आहे कारण त्यामुळे नाट्यपरिणामात विघ्ने येतात.

नाटकात नाच आला पाहिजे ही अलीकडील टूम वाईट आहे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

रे. टिळक यांच्या भाषणात नाट्यविषयक विचार खूपच सखोल रितीने व्यक्त झालेला दिसतो. वादग्रस्त मुद्यांना नुसता स्पर्श न करता त्यांनी आपले मत स्पष्टपणे नोंदविले आहे. आत्मगत भाषणे, 'वन्स मोअर याबाबतच्या त्यांच्या सूचना बहुसंख्य नाट्यरसिकांना अमान्य होण्यासारख्या होत्या परंतु तरीही त्यांनी त्याबद्दल सकारण, मुद्देसूद विवेचन केलेले आहे. इतर अध्यक्षीय भाषणांच्या तुलनेने हे भाषण वेगळे उमटून पडणारे आहे असे जाणवते.

(७) बाराव्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. शं. बा. मुजुमदार यांचे विचार

बाराव्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष श्री. शं. बा. मुजुमदार हे होते. त्यांनी असे मत व्यक्त केले की, नाट्यकलेच्या उन्नतीकरता ज्यांचे सहाय्य घ्यायचे ते नाट्यव्यवसायाबाहेरचे पण कलेच्या उत्कर्षाविषयी चिंतन करीत असलेले विद्वान पाहिजेत. कारण महाराष्ट्र-नाट्यकला अद्याप बाल्यावस्थेत आहे. तिला योग्य मार्गदर्शक पाहिजे आहेत नाटक व्यवसायातील गोष्टींचा विचार ह्याच व्यवसायातील लोकांनी करावयास पाहिजे हे खरे आहे; परंतु दुसऱ्याचे

रोग बरा करणारा वैद्य स्वत: रोगी बनला म्हणजे जसा दुसऱ्या निष्णात वैद्यांच्या औषधोपचाराने आपल्यास बरे करून घेतो किंवा क्रिकेटच्या डावातील खेळाडू मोठे निष्णात असले तरी आपल्याला बरोबर न्याय मिळण्याकरिता न्यायस्थानी तटस्थ अशा ‘ अंपायर ची योजना करतात ह्याप्रमाणे नाट्यकला व तदंगभूत इतर विषय यांच्या योग्यायोग्यतेचा निर्णय करण्याच्या कामी प्रत्यक्ष नाट्यव्यवसायातील लोकांपेक्षा बाहेरच्याच लोकांच्या सहाय्यतेची विशेष अपेक्षा आहे.

श्री. मुजुमदार यांचा हा विचार एका दृष्टीने बरोबर आहे. दूर राहून तटस्थपणे विचार करणाऱ्याला गुणावगुण नेमकेपणे कळतात. पण त्याचबरोबर, त्या व्यवसायात असलेल्या व्यक्तींना अडीअडचणी आणि त्यांची कारणेही जवळून माहिती असतात. तशी व्यवसायाबाहेरच्या व्यक्तीला माहिती असतीलच असे नाही. कोणतेही पूर्वग्रह मनात नसलेल्या व्यक्तींकडून नाट्यकलेचे, नाट्यव्यवसायाचे परिशीलन व्हावे, त्यांनी नाट्यकलेच्या विकासाला मदत करावी असे श्री. मुजुमदार यांना सुचवावयाचे आहे.

प्रस्तुत व्याख्यान १९१६ सालचे आहे त्यामुळे महायुध्दाचा उल्लेख यातही आला आहे. महायुद्ध सुरू असल्याने नाटकाच्या धंद्याला लागणाऱ्या वस्तू दुर्मिळ झाल्या असल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्याचप्रमाणे नाटक मंडळ्यांनी द्रव्यरूपाने लढाई फंडाला मदत केल्याची माहितीही दिली आहे.

नाटककार, प्रेक्षक व नटवर्ग ही नाट्यकलेची तीन प्रधान अंगे होत असे म्हणून नाट्यकलेच्या अभिवृध्दीची बरीच भिस्त नटवर्गावरच येऊन पडते असे मत दिले आहे.

नटवर्गाची अंत:स्थिती चांगली पाहिजे तरच त्यांची कामे नीट रीतीने होतील असे श्री. मुजमदार यांना वाटते आहे. नटवर्गाची दु:स्थिती त्यांना जवळून पाहावयास मिळत होती म्हणूनच त्याबद्दल कोणीही न मांडलेला विचार त्यांनी मांडला आहे. इंग्लडमध्ये प्रत्येक नटाची, नटण्याची स्वतंत्र खोली असते त्यामुळे त्याची मन:स्थिती शांत राहून त्याला त्याचे काम उत्तम रितीने यथास्थित वठवता येते.

वरवर साधी वाटणारी ही नटाची अडचण, त्याचे कार्य उत्तम होण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. रंगमंचावर पाऊल ठेवण्यापूर्वी नटाला एकान्त मिळणे, त्याची वेषभूषा इ. व्यवस्थित

होणे, तो स्वस्थचित्त असणे अत्यंत आवश्यक आहे हा विचार कोणत्याही काळात मोलाचा आहे. त्याचा संबंध नटाच्या माणूस असण्याशी आहे. ही गोष्ट नाटकमंडळीचे व्यवस्थापक असलेल्या श्री. मुजुमदार यांना जाणवली त्यात त्यांचे अनेक गुण दिसून येतात. आपली नाट्यकला बाल्यावस्थेत आहे हे त्यांना जाणवत असल्यामुळे तिच्या उत्कर्षासाठी किती सूक्ष्म तपशीलात्मक विचार ते करीत होते, पाश्चात्य रंगभूमी आणि रंगभूमीशी निगडित अशा अनेक गोष्टींचे वाचन, चिंतन करीत होते हे यावरून दिसून येते.